महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | FAX- 020/25536761 |
|---|---|---|
| 25536722 (OFF) | 25536781/82/83 / | E-MAIL - sscboardpune@gmail.com<br>Website- www.sscboardpune.in |


जा.क्र पुविमं/माध्य शाखा क/ 1576
पुणे–४११००५
दिनांक : 21/०२/२०२६

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा ,
जिल्हा–पुणे, अहिल्यानगर व सोलापूर.

विषय : फेब्रुवारी/मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इ.१० वी परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या दिव्यांग सवलतीबाबत केंद्र संचालक यांना दयावयाच्या महत्वाच्या सूचना

संदर्भ : केंद्रसंचालक व परिरक्षक यांच्यासाठी सूचना पुस्तिका–

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मंडळामार्फत फेब्रुवारी/मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इ.१० वी परीक्षा दिनांक २०/०२/२०२६ ते दि. १८/०३/२०२६ पर्यंत आयोजित करण्यात आलेली आहे. सदर परीक्षा सुरू झाली असून, ब–याच शाळेकडून दिव्यांग सवलत मिळणेचे प्रस्ताव कार्यालयास ई–मेलद्वारे प्राप्त होतात.

त्यामुळे विद्यार्थी हित लक्षात घेता केंद्रसंचालक व परिरक्षक यांच्यासाठी सूचना पुस्तिकेमध्ये दिव्यांग परिक्षार्थ्यांबाबत (Divyang Candidates) केंद्रावर करावयाची कार्यवाही याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे केंद्रसंचालक यांनी कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची एक प्रत मंडळाला मेलद्वारे सादर करावी. तसेच मूळ प्रस्ताव या कार्यालयात जमा करावा. कोणताही दिव्यांग विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

MBRaut
(मिनाक्षी राऊत)
विभागीय सचिव,(प्र)
पुणे विभागीय मंडळ, पुणे.

Scanned with OKEN Scanner

८. पर्यवेक्षकाने प्रपत्र १, २ व ३ मधील नोंदी काळजीपूर्वक कराव्यात.

९. सर्व परीक्षार्थ्यांना त्यांच्या बैठक क्रमांकाच्या जागीच बसण्याबाबत सूचना द्याव्यात व स्वतः खात्री करून घ्यावी.

१०. ऐनवेळी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या परीक्षार्थ्यास/मूळ बारकोड खराब झाल्यास तसेच विषय बदलल्यास परीक्षार्थ्यास इमर्जन्सी बारकोड स्टिकर द्यावे. त्याची नोंद कारणासह प्रपत्र क्रमांक १ व २ मध्ये करून परीक्षार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी.

११. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकेवर पर्यवेक्षकाने स्वतः बारकोड स्टिकर/दिव्यांग स्टिकर लावावे.

१२. परीक्षार्थ्यास त्याने निवडलेल्या विषय/माध्यमाची प्रश्नपत्रिका दिली गेली आहे याची खात्री करावी व प्रश्नपत्रिकेवर विहित जागी (उजव्या बाजूस कोपऱ्यात) बैठक क्रमांक नोंदविण्याची सूचना द्यावी.

१३. परीक्षार्थ्यांकडून मागणी आल्यावरच पुरवणी उत्तरपत्रिका देण्यात यावी. त्याची नोंद प्रपत्र १ व पुरवणी हिशोब प्रपत्र ३ व उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावर नोंद केल्याची खात्री करावी.

१४. परीक्षा सुरू झाल्यानंतर २० मिनिटाने प्रपत्र २ वर गैरहजर विद्यार्थ्यांचे बारकोड स्टिकर चिकटवावे व प्रपत्र १ मध्ये बैठक क्रमांकासमोर अनुपस्थित (Absent) दर्शवावे.

१५. **पर्यवेक्षकाने गैरमार्ग प्रकरणी उत्तरपत्रिकेसंदर्भात करावयाची कार्यवाही** – विद्यार्थ्याने परीक्षा काळात गैरप्रकार केल्यास त्याचा बैठक क्रमांक प्रपत्र १ व २ मध्ये लिहावा. विद्यार्थ्यास दुसरी उत्तरपत्रिका द्यावी. पहिल्या उत्तरपत्रिकेवर (Copying case) व दुसऱ्या उत्तरपत्रिकेवर (Copying case second answerbook) असे लाल शाईने पर्यवेक्षकाने लिहावे व पेपर संपल्यानंतर दोन्ही उत्तरपत्रिका बैठक क्रमांक नोंदवून केंद्रसंचालकाकडे द्याव्यात.

१६. परीक्षा संपल्याची घंटा झाल्याबरोबर पर्यवेक्षकांनी परीक्षा कक्षातील सर्व परीक्षार्थ्यांच्या उत्तरपत्रिका गोळा कराव्यात. परीक्षा कक्षातील सर्व विद्यार्थ्यांकडून उत्तरपत्रिका, पुरवण्या प्राप्त झाल्याची खात्री केल्याशिवाय परीक्षार्थ्यास परीक्षा कक्ष सोडू देवू नये.

१७. उपस्थित परीक्षार्थ्यांच्या संख्येपेक्षा उत्तरपत्रिका कमी आढळल्यास तातडीने केंद्रसंचालक व परिरक्षक यांना कळवावे व लेखी अहवाल विभागीय मंडळास सादर करावा.

➤ **दिव्यांग परीक्षार्थ्यांबाबत (Divyang Candidates) केंद्रावर करावयाची कार्यवाही : –**

१. दिव्यांग परीक्षार्थ्यांबाबत विभागीय मंडळाने दिलेले सवलतीचे पत्र तपासावे.

२. काही परीक्षार्थी परीक्षेपूर्वी मंडळाकडे सवलतीबाबत मागणी न करता ऐनवेळी केंद्रसंचालकाकडे देय सवलतीचा आग्रह धरतात. अशाप्रकरणी केंद्रसंचालकांनी केंद्रनिहाय यादीमधून अपंग सांकेतांक तपासून घ्यावा.

३. परीक्षार्थ्याने ऐनवेळी सवलतीची मागणी केली असेल तर अशा परीक्षार्थ्यांकडे जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी प्रमाणित केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र UDID card असल्याची खात्री करूनच त्यांना देय सवलतीबाबत उचित निर्णय घेण्यात यावा तसे मंडळास तात्काळ कळवावे.

४. अपघात, शस्त्रक्रिया या कारणांमुळे ऐनवेळी लेखनिकाची मागणी करण्यात येते अशावेळी केंद्रसंचालकांनी दक्षतापूर्वक निर्णय घ्यावा. अशा प्रत्येक प्रकरणी विभागीय मंडळाची परवानगी प्राप्त करणे ही परीक्षार्थी व त्याच्या शाळा/कमविच्या मुख्याध्यापक/प्राचार्य यांची जबाबदारी आहे. तोपर्यंत त्यादिवशीचे पेपरसाठी तात्पुरती आवश्यक देय सवलत देण्यात यावी. अशा प्रकरणी जादा वेळेची सवलत अनुज्ञेय नसते.

Scanned with OKEN Scanner

५. लेखनिक निवड व नियुक्तीचे अधिकार मंडळास राहतील. तथापि, आपत्कालीन परिस्थितीत व घटनेची पडताळणी करून लेखनिक नियुक्तीचे अधिकार केंद्रसंचालकास आहेत.

६. दिव्यांग विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या आदल्या दिवशी संबंधित केंद्रसंचालकांना विहित सवलत मिळणेबाबत विनंती करणे आवश्यक राहील. याबाबतची सूचना केंद्रसंचालकाने परीक्षा केंद्रावर ठळकपणे प्रसिध्द करावी.

७. इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांना दिनांक १६/१०/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुषंगिक सर्व सवलती देण्याची कार्यवाही करावी.

➢ **दि. १६ ऑक्टोबर २०१८ रोजीच्या शासननिर्णयानुसार दिव्यांग असलेल्या परिरक्षार्थींसाठी देय सवलती**

| अ. क्र. | प्रकार | लेखनिक देता येते काय | जादा वेळ प्रती तास | |
|---|---|---|---|---|
| | | | इ.१० वी | इ.१२ वी |
| १. | अंशतः अंध/पुर्णतः अंध | होय | २० मिनीटे | २० मिनीटे |
| २. | कुष्ठरोगातून बरा झालेले निवारित | होय | २० मिनीटे | २० मिनीटे |
| ३. | कर्णबधीर | नाही | २० मिनीटे | २० मिनीटे |
| ४. | अस्थिव्यंग | होय | २० मिनीटे | २० मिनीटे |
| ५ | शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) | होय | २० मिनीटे | २० मिनीटे |
| ६ | बौध्दिक अक्षम (मतीमंद) | होय | २० मिनीटे | २० मिनीटे |
| ७ | बहुविकलांग (स्पॅटिक) | होय | २० मिनीटे | २० मिनीटे |
| ८ | मानसिक आजार | होय | २० मिनीटे | २० मिनीटे |
| ९ | स्वमग्न (Autism) | होय | २० मिनीटे | २० मिनीटे |
| १० | सेरेबल पाल्सी | होय | २० मिनीटे | २० मिनीटे |
| ११ | स्नायूंची विकृती | होय | २० मिनीटे | २० मिनीटे |
| १२ | मज्जासंस्थाचे तीव्र आजार | होय | २० मिनीटे | २० मिनीटे |
| १३ | अध्ययन अक्षमता (डिसकॅल्क्युलीया, डिस्लेक्सिया, डिसग्राफीया) | होय | २० मिनीटे | २० मिनीटे |
| १४ | गतीमंद | होय | २० मिनीटे | २० मिनीटे |
| १५ | मल्टीपल स्क्लेरॉसिस | होय | २० मिनीटे | २० मिनीटे |
| १६ | वाचा व भाषा अक्षमत्व | होय | २० मिनीटे | २० मिनीटे |
| १७ | थॅलस्सेमिया | होय | २० मिनीटे | २० मिनीटे |
| १८ | हिमोफिलिया | होय | २० मिनीटे | २० मिनीटे |
| १९ | सिकलसेल | होय | २० मिनीटे | २० मिनीट |
| २० | ॲसिड ॲटॅक व्हिक्टिम | होय | २० मिनीटे | २० मिनीटे |
| २१ | पार्किनसन्स | होय | २० मिनीटे | २० मिनीटे |
| २२ | इतर आजार (Epidermolysis Bullosa,HIV, Diabetes mellitus type,Peditric cancer survivors,Cancer afflicted children on | होय | २० मिनीटे | २० मिनीटे |

Scanned with OKEN Scanner

➢ **टीप :-** आकृत्या नकाशे, रचना याबाबत अंध (Blind-०१) बहुविकलांग (Spastic-०५), व अध्ययन अक्षमता (Learning disable-०६), असलेल्या परीक्षार्थ्यांना सुट असते व इयत्ता १० वी च्या अंध, मुकबधीर, शारीरीकदृष्ट्या दुर्बल, बहुविकलांग व अध्ययन अक्षमता असलेल्या परीक्षार्थ्यांच्या उत्तरपत्रिकेवर अंध, दिव्यांग असा उल्लेख करून व त्यावर विभागीय मंडळाने पुरविलेले स्टिकर चिकटवून त्या उत्तरपत्रिकांचा स्वतंत्र गठ्ठा करून त्या उत्तरपत्रिका परिरक्षकाकडे वेगळ्या द्याव्यात. तसेच इ.१२वीच्या ही दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्व विषयांच्या उत्तरपत्रिकांचा स्वतंत्र गठ्ठा करून त्या उत्तरपत्रिका परिरक्षकाकडे वेगळ्या द्याव्यात.

➢ **परीक्षार्थी गैरमार्गाचा अवलंब करतांना पर्यवेक्षक/उपकेंद्रसंचालक/केंद्रसंचालक/भरारीपथक सदस्य यांना आढळून आल्यास पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी :-**

१. संबंधित परीक्षार्थीची मूळ उत्तरपत्रिका व परीक्षार्थ्याजवळ सापडलेले दस्तऐवज काढून घ्यावेत.

२. मूळ उत्तरपत्रिकेवर **'कॉपी केस'** असे लाल शाईने लिहावे.

३. विद्यार्थ्यास दुसरी उत्तरपत्रिका (Second Answerbookl) देण्यात यावी व दुसरी उत्तरपत्रिका (Copying case Second Answerbook) असे नमूद करावे.

४. परीक्षार्थ्याजवळ सापडलेल्या प्रत्येक दस्तऐवजावर संबंधित परीक्षार्थ्यांचा बैठक क्रमांक टाकून त्याची दिनांकासह स्वाक्षरी घ्यावी. जर परीक्षार्थ्याने स्वाक्षरीस नकार दिला तर तसे दस्ताऐवजावर नमूद करून पर्यवेक्षकाने स्वाक्षरी करावी.

५. सोबतच्या परिशिष्ट-३ प्रमाणे प्रत्येक प्रकरणनिहाय स्वतंत्र अहवाल मूळ व दुय्यम उत्तरपत्रिकेसह विभागीय मंडळाकडे स्वतंत्रपणे पाठविण्यात यावा.

***************

Scanned with OKEN Scanner